1

विभागीय चौकशी
कंत्राटी तत्वावरील सेवानिवृत्त चौकशी
अधिकाऱ्याच्या मानधनात वाढ करणेबाबत.

# महाराष्ट्र शासन
## सामान्य प्रशासन विभाग
## शासन निर्णय क्रमांकः संकीर्ण-१०१४/प्र.क्र.५५/११-अ
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
तारीख: १६ फेब्रुवारी, २०१५

वाचा १) शासन निर्णय क्रमांक सामान्य प्रशासन विभाग क्रमांकः-एसपीओ-२८०४/ प्र.क्र.११/२००४/ ११-अ दि. २६ मे,२००६

२) शासन निर्णय क्रमांकः सामान्य प्रशासन विभाग क्रमांक-एसपीओ-२८०७/ प्र.क्र.२१/०७/११-अ दि. २८ ऑक्टोबर,२००९

## प्रस्तावना

संदर्भाधिन अ.क्र.१ येथील शासन आदेशानुसार प्रलंबित विभागीय चौकशीच्या प्रकरणांचा निपटारा करण्यासाठी दि. १ जुलै, २००६ पासून कंत्राटी पध्दतीने नेमलेल्या सेवानिवृत्त अधिकाऱ्याकडे प्रकरणे सोपवून निकाली काढण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या पध्दतीमध्ये अ.क्र.२ येथील आदेशान्वये बदल करून गट-अ व गट-ब (राजपत्रित) यांच्या विरूध्दची विभागीय चौकशी प्रकरणे सोपविण्यासाठी महसूल विभाग स्तरावर ६ प्रादेशिक चौकशी अधिकाऱ्याची पदे निर्माण करण्यात आली आहेत. तर गट-क व गट-ड च्या विभागीय चौकशीसाठी सध्या अस्तित्वात असलेली कंत्राटी तत्वावरील सेवानिवृत्त अधिकाऱ्याच्या प्रचलीत पध्दतीमध्ये काही बदल/सुधारणा करून तशीच चालू ठेवण्यात आलेली आहेत, असे बदल /सुधारणा अ.क्र.२ येथिल आदेशामधील परि. १(ब) येथे नमूद केलेले आहेत. कंत्राटी तत्वावर निवृत्त चौकशी अधिकाऱ्यानी प्रचलीत मानधनात वाढ करावी अशी शासनाकडे विनंती केली असून कंत्राटी सेवा निवृत्त चौकशी अधिकाऱ्याच्या मानधनात वाढ करण्याच्या प्रस्तावासंदर्भात शासन स्तरावर विचार विनिमय करण्यात आला, असून याबाबत शासनाने खालील प्रमाणे निर्णय घेतला आहे.

## शासन निर्णय

१) कंत्राटी पध्दतीने नियुक्त केलेल्या चौकशी अधिकाऱ्यांच्या प्रचलीत मानधनात बदल/वाढ करून एक अपचारी असलेलल्या विभागीय चौकशी प्रकरणी रू. ८०००/- इतक्या मानधना ऐवजी रू. १२,०००/- इतके मानधन देण्यात यावे. सुधारीत मानधन या आदेशाच्या दिनांका पर्यत त्यांच्याकडे प्रलंबित असलेल्या विभागीय चौकशी प्रकरणी व त्या पुढील प्रकरणाबाबत अनुज्ञेय राहील.

२) एका पेक्षा अधिक अपचारी असल्यास प्रत्येक अपचाऱ्या मागे रू. १५,००/- इतके वाढीव मानधन मूळ मानधनाच्या रकमेत (रू१२,०००) वाढवून देण्यात यावे. मात्र सदर मानधनाची कमाल मार्यादा रू. २४,०००/- इतकी राहिल.

३) वरील मानधना व्यतिरिक्त चौकशीच्या कामासाठी चौकशी अधिकाऱ्याने स्वत: नियुक्त केलेल्या लिपिक/टंकलेखक यांच्या सेवेपोटी रू. २०००/- एवढी अतिरिक्त ठोक रक्कम मंजूर करावी.

४) चौकशी अधिकारी याला प्रत्येकी चौकशी प्रकरणी रू. ७५०/-एवढया मर्यादेत प्रवास भत्यापोटी करावी लागणाऱ्या खर्चाच्या रकमेची प्रतिपूर्ती देय राहील. (फक्त "अ" व "ब" वर्ग शहरासाठी)

५) कंत्राटी नियुक्त अधिकाऱ्यांच्या मानधनावरील होणारा खर्च संबंधित कार्यालयाने/ विभागाने मंजूर कार्यालयीन खर्चातून भागविण्यात यावा.

६) हा शासन निर्णय वित्त विभागाच्या सहमतीने व त्या विभागाचा अनौपचारीक संदर्भ क्रमांक ६०८५५/व्यय-४ दिनांक २१ जानेवारी, २०१५ अन्वये दिलेल्या सहमती नुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१५०२१८१०२७२६९३०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Bhagwan Sahai

Digitally signed by Bhagwan Sahai
DN: c=IN, o=All India Service, ou=IAS, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Bhagwan Sahai
Date: 2015.02.18 19:38:23 +05'30'

(डॉ. भगवान सहाय)
अपर मुख्य सचिव (सेवा)

प्रत,

राज्यपालांचे सचिव
मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव
सर्व मंत्री व राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव/स्वीय सहायक
मुख्य सचिव/सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव मंत्रालयीन विभाग
*प्रबंधक, उच्च न्यायालय (मूळ शाखा), मुंबई
*प्रबंधक,उच्च न्यायालय (अपिल शाखा),मुंबई
*प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई
*सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
*सचिव,महाराष्ट्र लोकसेवा आयोग,मुंबई
*सचिव ,राज्य निवडणूक आयोग, मुंबई
सर्व विभागीय आयुक्त
सर्व जिल्हाधिकारी
सर्व मंत्रालयीन विभाग
मंत्रालयीन विभागाच्या नियंत्रणाखालील सर्व विभागप्रमुख/प्रादेशिकविभाग प्रमुख
सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने
निवडनस्ती
*पत्राने